UGC Care Listed Journal

ISSN-0976-5425


## मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद
### (छत्रपती संभाजीनगर)

# History Research Journal

## Issue - XXX

# इतिहास संशोधन पत्रिका

## अंक तीस






कार्यकारी संपादक

डॉ. सोमनाथ रोडे

Scanned by CamScanner

UGC Care Listed Journal

मराठवाडा इतिहास परिषद,
औरंगाबाद
(रजि.नं. एफ ८२० / दि. २६.०८.१९८२)
ISSN : 0976 – 5425

# History Research Journal

# इतिहास संशोधन पत्रिका

**Issue. - XXX** **May**
अंक - तीस 2023

कार्यकारी संपादक

**डॉ. सोमनाथ रोडे**

: संपादकीय मंडळ :

डॉ. जाकेर पठाण
प्रा. विजय पांडे
डॉ. सुभाष बेंजलवार
डॉ. नारायण सूर्यवंशी
डॉ. प्रभाकर मिरकड
डॉ. विनोद बोरसे
डॉ. बब्रुवान मोरे

या अंकात व्यक्त केलेली विचार-मते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद अथवा संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शिर्षक |
|---|---|---|---|
| ८. | श्री. नरसिंग रामराव चिट्टमवार | ९८ | वेताळवाडी किल्ल्याचे स्थापत्य : एक आढावा |
| | **गोषवारा** | | |
| १. | कु. सानिया सर्फराजखान पठाण | १०६ | बीड जिल्ह्यातील निरगुडी गावामधील पठाणाचे वंशज |
| २. | श्री. आकाश जनार्दन बोकडे | १०८ | औरंगाबाद शहरातील ऐतिहासिक सुरक्षा तटबंदी : एक आढावा |
| ३. | श्री. सुनील संपतराव पांडे | ११० | मुहंमद बिन तुघलकाची राजधानी परिवर्तनाची योजना |
| ४. | Dr. Jaynarayan D. Pardeshi | ११२ | The treatment of history in Girish Karnad's drama : Tughlaq |
| | **आधुनिक विभाग** | | |
| | डॉ. जगदीश व्यंकटराव भेलोंडे | ११७ | आधुनिक विभाग सत्राध्यक्षीय भाषण |
| १. | डॉ. गीतांजली भी. बोराडे | १२१ | १९ व्या शतकातील पितृसत्ता व सावित्रीबाई फुले यांचे स्वयंभू व्यक्तिमत्त्व आणि स्त्रीसत्वाचा शोध : एक उपेक्षित पैलू (इ. स. १८३१ ते १८९७) |
| २. | डॉ. ओमशिवा लिगाडे | १२८ | संशोधन अहवाल टंकलेखनाचे नियम |
| ३. | डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार | १३४ | महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचे स्त्री सुधारणाविषयक विचार व कार्ये |
| ४. | डॉ. तुकाराम एकनाथराव बोकारे | १४१ | हैद्राबाद संस्थान - उदय व वाटचाल : एक ऐतिहासिक अवलोकन |



UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

Scanned by CamScanner

३

# महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचे स्त्री सुधारणाविषयक विचार व कार्ये

डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, जि. लातूर

महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपले जीवितकार्य म्हणून अस्पृश्य सेवेचे कार्य केले असले तरी त्यांनी एवढेच कार्य केले असे नाही. महाराष्ट्रीयन किंबहुना भारतीय प्रबोधन परंपरेच्या परिप्रेक्षात त्यांच्या कार्याचा आणि चिंतनाचा विचार केल्यास त्यांच्या विचार व कार्याची बहुविविधता आणि मौलिकता लक्षात येते. त्यांनी आयुष्यभर केलेले कार्य आणि विविध सामाजिक प्रश्नांसंबंधी केलेले चिंतन यावरून त्यांना 'कर्मवीर' व 'महर्षी' ही दोन विशेषणे लावण्यात आलेली आहेत. ही विशेषणे त्यांच्या कार्यावर व स्वभाव विशेषांवर आणि त्यांच्या चिंतनशील व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी तर आहेतच त्याचबरोबर त्यांच्या कार्याची उंची दर्शविणारी आहेत. महर्षि शिंदे यांचे सबंध जीवनकार्य व चिंतन हे सामाजिक समता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य या दोन ध्येयांसाठी समर्पित असेच आहे. त्यांच्या सामाजिक समतेसाठीच्या चिंतनातूनच सामाजिक समतेसाठी महत्त्वाचे असलेले स्त्री सुधारणाविषयक विचार व कार्य प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रचलित धर्मव्यवस्थेच्या चिंतनातून महर्षि शिंदे यांनी स्त्रियांच्या दुस्थितीसंदर्भात अस्तित्वात असलेल्या सामाजिक प्रश्नांकडे लक्ष दिलेले दिसते. त्यांचा स्त्रियांकडे पाहण्याचा एक उदार आणि व्यापक दृष्टिकोन होता. त्यांनी स्वत: आपल्या आठवणींमध्ये नोंदवून ठेवले आहे की, "माझ्या सुधारणेच्या मताला आणि सामान्यत: स्त्रीजातीसंबंधी कारुण्यालाही पूर येत चालला होता."[१] खरोखर समाजस्थिती सुधारायची असेल तर स्त्रियांना सर्व क्षेत्रांत सहभागी करून घेतले पाहिजे, असे त्यांचे मत बनत चालले होते. केवळ मत मांडूनच ते स्वस्थ बसले नाहीत तर त्यांची सुरुवात त्यांनी स्वत:पासून केली. तत्कालीन रिवाजानुसार त्यांच्याहून पाच वर्षांच्या लहान असलेल्या बहिणीचे अर्थात



Scanned by CamScanner

जनाक्का (जनाबाई) यांचा विवाह बालवयातच झाला होता. जनाक्का यांना शिंदे कुटुंबात रामजीबाबांच्या समतावादी विचारांमुळे मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण मिळाले होते. परंतु त्यांचा ज्या कृष्णराव कामतेनामक गृहस्थाशी विवाह झाला होता ते मात्र निरक्षर होते. त्यामुळे त्यांनी जनाबाईला त्रास द्यावयास सुरुवात केली. त्यांचे पती कृष्णराव हे व्यसनाधीनतेत आणि बाहेरख्यालीपणा यांत पुरते गुंतले होते. त्यामुळे जनाबाई यांचे सासरी राहणे असह्य बनले होते. ही बाब इंटरमीजिएटच्या वर्गात शिकत असलेल्या विठ्ठलरावांना खटकली आणि त्यांनी आपल्या बहिणीला या त्रासातून वाचविण्यासाठी सासरी पाठवायला नकार दिला.

रामजीबाबा यांनी या प्रसंगी महर्षि शिंदे यांना तत्कालीन परंपरा समजावून सांगताना म्हटले होते की, 'अरे बाबा एक वेळ हत्ती पोसवेल पण लग्न झालेली, नवरा हयात असलेली मुलगी घरी ठेवता येणे अशक्य आहे. तू चार बुके शिकून आला आहेस तेव्हा कानांत वारे शिरल्यासारखे वागू नकोस ! ज्याच्याशी जन्माची गाठ बांधली आहे त्याच्याकडे तिला पाठवू या.'[२] परंतु महर्षि शिंदे यांनी आपल्या वडिलांचे परंपरावादी विचार या वेळी काही एक ऐकले नाहीत. उलट आपल्या सुधारणावादी विचारांच्या ध्येयावर ठाम राहात स्पष्टपणे सांगितले की, 'अशा स्थितीत मी काही तिला सासरी पाठविणार नाही, तिचा नवरा आपणहून तिला नांदवण्यास घेऊन जाण्यासाठी आला तरच तिला मी पाठवीन, एरव्ही माझ्या जिवात जीव असे-पावेतो मी काही तिला अंतर देणार नाही'[३] हा ठाम निर्धार त्यांनी शिक्षण घेत असताना व्यक्त केला होता आणि तो त्यांनी पाळलाही होता. प्रारंभी हा प्रश्न किती गंभीर आहे याची जाणीव त्यांना नसावी. या संदर्भात ते लिहितात, या सर्व प्रकरणाला मीच कारण होतो म्हणून जनाक्काच्या पुढच्या सर्व आयुष्याची जबाबदारी माझ्या कोवळ्या शिरावर पडली. हे किती प्रचंड ओझे मी माझ्या शिरावर घेतले याची मला त्या वेळी काहीच कल्पना नव्हती ![४] यावरून हे लक्षात येते की महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भावी सुधारणावादविषयीची भूमिका याच वेळी निश्चित झाली होती.

महर्षि शिंदे यांनी जनाक्काची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सोबत पुण्याला आणले. जनाक्का मराठी चौथी इयत्तेपर्यंत शिकलेल्या होत्या. पुण्यात मुलींच्या शिक्षण देणाऱ्या काही संस्था सुधारकांनी सुधारणावादी हेतूने काढल्या होत्या. त्यामुळे



Scanned by CamScanner

आपल्या बहिणीलाही या संस्थांमधून शिक्षण मिळेल या आशावादाने ते प्रथमत: शारदा सदनमध्ये पंडिता रमाबाई यांच्याकडे गेले. त्यांनी महर्षि शिंदे यांचे जनाक्का संदर्भातील सर्व म्हणणे ऐकून घेतले व काही अटी लावून शारदा सदनमध्ये घ्यायला मान्यता दिली. त्यातील एक अट होती - प्रवेश घेतल्यापासून पाच वर्षापर्यंत जनाक्कला घरी जाता येणार नाही. या पाठीमागचा त्यांचा अंतस्थ हेतू जनाक्कावर खिस्ती विचारांचा प्रभाव निर्माण करणे हा होता परंतु हे महर्षि शिंदे ओळखून होते. त्या संदर्भात त्यांनी आपल्या आठवणींमध्ये लिहिले आहे की, ज्या नवमताचे पाणी ही पंडिता प्याली होती त्याचे चार थेंब माझ्याही पोटात गेले होते. मी उत्तर दिले, "बाई शिक्षणात अडथळे आणण्यासाठी मी बहिणीस तुमच्याकडे पाठविण्याचे कारणच नाही. तिने खिस्ती होण्यास अडथळे आणू ही भीतीसुद्धा असणे साहजिक आहे. मुलीच्या हिताची काळजी निदान तुमच्याइतकी तरी मला व मुलीच्या आई-बापाला आहेच हा विश्वास तुम्हाला असावा. तुमच्या शिक्षणाने मुलगी आपखुशीने व अक्कलहुशारीने खिस्ती होऊ लागल्यास निदान मी तरी अडथळा आणणार नाही. तिच्यावर तिला न कळत, जबरी तर राहो पण भूलभुलावणी होऊ लागली तर ते मी सहन करणार नाही. बेहत्तर तुमची अटीतटीची मदत न मिळाली तरी."[५]

महर्षि शिंदे यांचा हा विचार पाहता स्त्री सुधारणेच्या अनुषंगाने त्यांची असलेली तळमळ आपल्याला लक्षात येऊ शकते. आपल्या बहिणीला शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न करीत असताना पंडिता रमाबाई यांच्या सुधारणेमागील पारंपारिक विचारांना त्यांनी छेद देण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर यामध्ये स्त्री स्वातंत्र्याचा त्यानुषंगाने स्त्रीवादाचाही पुरस्कार करीत असताना शिक्षणाने प्रभावित झाल्यानंतर स्वत:ला पटलेली मते जनाक्काने स्वीकारली अथवा स्वबुद्धीने खिस्ती विचार स्वीकारला तर त्याला मोठा भाऊ म्हणून विरोध न करता त्याचे स्वागत करण्याची तयारी त्यांनी या ठिकाणी दर्शविली होती हे विशेष होय. पंडिता रमाबाईंप्रमाणेच स्त्री शिक्षणाचे काम करणाऱ्या महर्षि कर्वे यांच्या हिंगणे येथील अनाथ बालिकाश्रमात शिक्षणासाठी घेता काय हे विचारले असता "ब्राह्मणेतरांच्या मुलींना घेण्याचा हा काळ नाही" असे प्रोफेसर अण्णासाहेबांनी सांगितले व माझ्या बहिणीला आश्रमात घेण्याचे साफ नाकारले. यामुळे माझी फार निराशा झाली.[६] यावरून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा त्यांच्या कार्यात सुधारक म्हणविणाऱ्या सुधारकांनीच लोकरुढीला घाबरुन कसे



Scanned by CamScanner

अडथळे निर्माण केले याची प्रचीती येते. तरीसुद्धा महर्षि शिंदे यांनी आपल्या बहिणीला शिकविण्याची जिद्द न सोडता पुण्यातील हुजूर पागा या ठिकाणी असलेल्या प्रसिद्ध मुलींच्या शाळेत प्रवेश मिळवून दिला.

जनाक्कांचे विवाहापूर्वी मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण जमखंडीत झाले होते परंतु पुढच्या शिक्षणासाठी त्यांना हुजूर पागा शाळेने त्यांच्या पतीची परवानगी मागितली. इथेही विठ्ठलरावांना हिंदू स्त्रीच्या पारतंत्र्याची जाणीव झाली. कारण जनाक्काच्या पतीने 'माझ्या पत्नीला शाळेत दाखल करण्यास परवानगी नाही"[7] असे कळविले. तेव्हा जनाक्काच्या शिक्षणासंदर्भात शाळेची सर्व जबाबदारी महर्षि शिंदे यांनी स्वीकारली आणि स्त्रीला पारतंत्र्यात ठेवणारी हिंदू परंपरा नाकारून त्यांचे शाळेत जनाक्का शिंदे असेच नाव दाखल केले. 'जनाक्काची सासरची करुण अवस्था, विठ्ठलरावांचा स्त्री शिक्षणाकडे असणारा ओढा, रुढ आचारांविरुद्ध माहेरी ठेवून घेण्यात त्यांनी दाखविलेले अपूर्व धाडस आणि आपली सुधारकी मते प्रत्यक्षात आचरून दाखविण्याची त्यांची तळमळ बघून शाळेच्या अधिकाऱ्यांनी जनाक्काचे शिंदे हे आडनाव लावले व ते कायमचे झाले.'[8]

महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्री सुधारणेच्या संदर्भातील शिक्षणविषयक विचार हे तर जनाक्काला शिक्षण देऊन कृतीत उतरविले होते परंतु अन्य स्त्रियांनासुद्धा शिक्षण मिळावे, ते मुलांप्रमाणे सहज घेता यावे, अशी त्यांची भूमिका होती. त्यानुषंगाने इ. स. १९१९ मध्ये पुणे नगरपालिकेने आपल्या हद्दीत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासंबंधी विचार सुरु केला होता. हे केवळ मुलांपुरतेच मर्यादित राहू नये तर मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे, असा विचार त्यांनी व्यक्त केला. या वेळेला पुण्यात राजकीय क्षेत्रात जहाल मानल्या जाणाऱ्या नेत्यांना मात्र या वेळी मुलांपुरतेच प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे, मुलींना प्राथमिक शिक्षणाची सक्ती करू नये असा विचार होता. तेव्हा त्यांच्या विरोधात जाऊन महर्षि शिंदे यांनी मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीने द्यावे ही भूमिका घेतली. मुलांप्रमाणेच मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीचे देणे कसे आवश्यक आहे याबाबत अण्णासाहेबांनी 'ज्ञानप्रकाश' मध्ये एक लेखमाला लिहिली व तीमधून मुलांच्या जोडीने मुलींनाही सक्तीचे शिक्षण देणे कसे न्यायाचे व आवश्यक आहे याचे प्रतिपादन केले.[9] आपल्या लेखमालेच्या माध्यमातून मुलींच्या प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासंदर्भात लोकांमध्ये जागृती घडवून आणण्याचे त्यांनी काम केले.


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425
Scanned by CamScanner

महर्षि शिंदे केवळ लेखमाला लिहून थांबले नाहीत तर पुण्यातील मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाला विरोध करणाऱ्या जहालवाद्यांना आणि पुणे नगरपालिकेला हा प्रश्न किती महत्त्वाचा आहे हे लक्षात यावे म्हणून स्त्रियांची मोठी मिरवणूक काढली. १२ फेब्रुवारी १९२० रोजी म्युनिसिपालिटीची जनरल सभा या प्रश्नाचा विचार करण्यासाठी भरणार होती. त्या दिवशी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्रियांची एक जंगी मिरवूणक पुणे शहरातून काढली. स्त्रियांच्या मिरवणुकीचा हा अपूर्व देखावा पाहण्यासाठी हजारो लोकांची गर्दी जमली. त्या दिवशीची म्युनिसिपालिटीची सभा तहकूब करावी लागली.[१०] या घटनेमुळे मुलींच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. याच दरम्यान हा प्रश्न सोडविण्याच्या हेतूने महर्षि शिंदे समर्थक आणि विरोधक यांच्यात एकवाक्यता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होते. त्याच हेतूने पुणे नगरपालिकेच्या वतीने किर्लोस्कर थिएटरमध्ये चीफ ऑफिसर शंकरराव भागवत यांच्या अध्यक्षतेखाली मतदारांची सभा भरविण्यात आली होती परंतु विरोधकांनी पूर्वीच कट करून मुलींच्या शिक्षणाच्या बाजूने बोलणाऱ्यांचे भाषण होऊ देऊ नये म्हणून गर्दी जमविली होती. सभेत जहाल पक्षाने गोंधळ घातल्यामुळे मवाळ गटानेही गोंधळ करायला सुरुवात केली. अखेरीस टिळक भाषण करण्यासाठी उभे राहिले. श्रोते ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नव्हते. दोन्ही पक्षांच्या चाहत्यांमध्ये मारामारी सुरु झाली. खुर्च्यावर खुर्च्या आदळू लागल्या. कोणी एकाने टिळकांच्या अंगावर अंडी फेकली. टिळकांना मार लागू नये म्हणून विठ्ठल रामजी शिंदे यांना मध्ये पडावे लागले.[११] एकूण हा सर्व प्रकार लक्षात घेता महर्षि शिंदे यांना जहाल व मवाळ यांच्यात समन्वय साधून हा प्रश्न सोडवून मुलींना सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळवून द्यावयाचे होते परंतु गदारोळात सभा संपल्यामुळे त्यावर निर्णय होऊ शकला नाही.

भारतामध्ये विशेषत: पश्चिम भारतात हिंदू देवालयांमध्ये स्त्रियांच्या संदर्भातील काही बीभत्स प्रकार प्रचलित होते. त्यातीलच एक प्रकार म्हणजे मुरळी सोडण्याचा प्रकार होय. ही प्रथा प्रत्यक्ष महर्षि शिंदे यांच्या जमखंडी या गावामध्येही प्रचलित होती. जमखंडीच्या शाळेतील एका दहा वर्षांच्या लहान मुलीला मुरळी सोडण्यात आली असे विठ्ठलरावांना समजल्यानंतर त्यांनी तिला घरी बोलावून घेतले आणि तिच्या पुढे शिक्षणाची चांगली व्यवस्था ठेवण्याबद्दल तिच्या आई-बाबांना बजावले. निदान मुरळीचा धंदा तिने चालवू नये, अशी त्यांना ताकीद दिली.[१२] या घटनेचे पडसाद एवढे प्रतिकूल


Scanned by CamScanner

बनले की, त्यामुळे विठ्ठल रामजी शिंदे यांना आपले गाव आई-वडिलांसह सोडावे लागले. या घटनेमुळे महर्षि शिंदे यांनी या बीभत्स आणि सामाजिक व स्त्रियांच्या जीवनातील या प्रश्नाला कसे नाहीसे करता येईल याचा ध्यास घेतला. मुरळी म्हणजे हिंदू देवळांना लहान मुली वाहण्याचा किंवा हिंदू देवांशी त्यांचा विवाह करण्याचा तो चमत्कारिक प्रघात या देशात पुरातन काळापासून चालत आलेली परंपरा होय. बहुतकरुन ही चाल वांझ बायका आपल्याला मुले व्हावीत म्हणून जे देवभोळेपणाचे नवस करीत असतात त्यामुळे किंवा तरुण आणि धर्मभोळ्या बायकांच्या धर्मवेडामुळे अस्तित्वात आली असावी. या चालीचे दुष्ट प्रकार आम्हाला हिंदुस्तानातील मोठमोठ्या देवस्थानांतून सर्व हिंदू समाजामध्ये पसरत असलेले दिसून येतात.[१३]

ही धार्मिक प्रथा समाजावर पर्यायाने स्त्री जीवनावर परिणाम करणारी असल्याने महर्षि शिंदे यांना एक सामाजिक प्रश्न म्हणून महत्त्वाचा वाटतो. या संदर्भात त्यांनी मुरळी अथवा पश्चिम हिंदुस्तानातील हिंदू देवळांतील अनीती-मूलक आणि बीभत्स प्रकार या शीर्षकाचा लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी तत्कालात ही प्रथा समाजातील विशेषत: निम्न जातींमध्ये अस्तित्त्वात असल्यामुळे तो संपविण्याच्या अनुषंगाने चिंता व्यक्त केली आहे. शिक्षण हा जरी त्यावरील उपाय असला तरी तो तेवढा परिणामकारक नाही याचीही जाणीव महर्षि शिंदेंना होती. शिवाय सरकारच्या पातळीवर होणारे प्रयत्न आणि या संदर्भातील शासकीय कागदपत्रांमध्ये असलेली आकडेवारी ही सुद्धा या अनुषंगाने अनुकूल नसल्याचे खानेसुमारीच्या अहवालाचे दाखले देऊन त्यांनी स्पष्ट केले आहे. या प्रथेच्या विरोधात उपाय सुचवित असताना ते म्हणतात, या बाबतीत उपाय करावयाचे ते दोन प्रकारचे, एक प्रतिबंधात्मक व दुसरा उपशामक, पहिल्या संबंधाने इंडियन पीनल कोडचे ३७२ व ३७३ ही कलमे करुन सरकारने आपले कर्तव्य बजावले आहे. त्याच्या पुढील कामगिरी बजावण्यासाठी या बाबतीत कड्या खासगी, परोपकारी मंडळीनेच संघटित स्वरुपात पुढे आले पाहिजे[१४] असा विचार त्यांनी व्यक्त केला. महर्षि शिंदे यांचा स्वभावगुण म्हणजे एखादा विषय हाती घेतला की तो तडीस नेणे. याच अनुषंगाने त्यांनी मुरळी सोडण्याची अनिष्ट चाल बंद व्हावी यासाठी १९०७ मध्ये त्यांनी मुंबई येथे एक संस्था स्थापन केली व तिचे ते सेक्रेटरी झाले. या कामी सरकारी यंत्रणेचे सहकार्य त्यांनी उपलब्ध करुन घेतले आणि या संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती घडवून आणली.



Scanned by CamScanner

**सारांश :**

महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी केलेले स्त्री सुधारणाविषयक कार्य हे त्यांच्या धर्मव्यवस्थेच्या चिंतनातून आणि एकूणच स्त्री जातीबद्दल त्यांच्या मनात असलेला कळवळा यातून आला होता. स्त्रीजीवनाच्या अनुषंगाने समाज जीवनात अस्तित्वात असलेल्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन ते सोडवण्याचा प्रयत्न त्यांच्या विचार व कार्याच्या केंद्रवर्ती दिसतो. हा प्रश्न स्वत:च्या कौटुंबिक जीवनाशी संबंधित असो अथवा सार्वजनिक स्वरुपाचा तो समजावून घेऊन सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी हिरीरीने केलेला दिसतो. त्यांच्या या कार्याचे वेगळेपण म्हणजे त्यांनी प्रचलित पारंपारिक प्रथा, परंपरांना नाकारण्याचे धाडस दाखविले होते. प्रसंगी त्यांना समाजरोषही पत्करावा लागला होता. स्वत:च्या जन्मगावात त्यांना गावकऱ्यांचा विरोध व टीकेला सामोरे जावे लागले होते; परंतु आपले सुधारकी कार्य त्यांनी अर्ध्यात सोडले नाही. त्याचा कायम पाठपुरावा करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या अनुषंगाने जी म्हणून भूमिका घेणे आवश्यक होती ती त्यांनी घेतलेली दिसते.

**संदर्भ :**


(१) शिंदे वि. रा., माझ्या आठवणी व अनुभव, वत्सला साहित्य प्रकाशन, १९४०, पृ. १५५.

(२) पवार गो. मा., महर्षि विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य, लोकवाङ्मय गृह, २००४, पृ. ३२.

(३) उपरोक्त, पृ. ३२.

(४) उपरोक्त, शिंदे वि. रा., पृ. १५६.

(५) उपरोक्त, पृ. १६७-१६८.

(६) उपरोक्त, पृ. १६८.

(७) उपरोक्त, पवार गो. मा., पृ. ३४.

(८) उपरोक्त, पृ. ३४.

(९) उपरोक्त, पृ. ३५५.

(१०) उपरोक्त, पृ. ३५५.

(११) उपरोक्त, पृ. ३५७.

(१२) उपरोक्त, पृ. १७५.

(१३) पवार गो. मा. (संपा.), निवडक विठ्ठल रामजी शिंदे, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २०१२, पृ. १७७.

(१४) उपरोक्त, पृ. १८२.


ooo



Scanned by CamScanner